**MHYA050020382025**

**नियमित दिवाणी दावा क्र.६७/२०२५**
**अनिल कांबळे –वि.–जिल्हाधिकारी व इतर**
**निशाणी क्र.५ वर आदेश**
(दिनांक २५/०६/२०२५)

---

वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ ते ५ व ८,९ यांनी शहिद स्मारकाचे बांधकाम करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळावा यासाठी वादींनी हा अर्ज दाखल केला.

**०२.** दावा निशाणी क्र१ मधील परिच्छेद क्र.३ मध्ये चतुःसिमेसहित नमुद केलेली पुर्ण खुली जागा आणि प्रतिवादी क्र.८ ने दिलेला कार्यारंभ आदेश या दोन्ही बाबी या दाव्यातील वादातील आहेत असे वादीचे कथन आहे. म्हणजेच वाद जागा व वाद आदेश हा दाव्याचा विषय आहे.

**०३.** वादींचे असे कथन आहे की, त्यांच्या गावातील शहिद रामरावजी सोडगीर यांच्या हुतात्म्याबद्दल त्यांना आदर आहे व अभिमान आहे.

**०४.** वादींचे पुढे असे कथन आहे की, शहिद रामरावजीचे स्मारक बनविण्यासाठी प्रतिवादी क्र.६ व ७ सरपंच आणि सचिव ग्राम पंचायत, बेलोरा यांनी दि.२६/११/२०१५ रोजी सभा घेतली व ग्रामपंचायतीची नसलेली जागा देण्याचे ठरविले व बेकायदेशीर ठराव पारीत केला आणि बौध्द विहार/समाज मंदीर च्या चहुबाजुच्या परिसरातील असलेल्या १९५०० चौ.फुट जागेमधील जागा स्मारकाला मंजुर केली.

**०५.** वादींचे पुढे असे कथन आहे की, ते बौध्द धर्माचे अनुयायी असुन ते यानुसार जिवन व्यतीत करत असुन नियमितपणे उपासणे करीता मौजे बेलोरा येथील स्थीत बौध्द विहारात जात असतात व त्याशिवाय विहारात उपासणेसह गावातील अनेक बौध्द धर्मीयांच्या सुख दुःखाचे कार्यक्रम, हर्षोल्हासाचे कार्यक्रम विहारा लगत असलेल्या १९५०० फुट जागेमध्ये होत असतात. गावाचे नागरीक समाज मंदीराचा व खुल्या जागेचा वापर सामाजीक धार्मीक आणि सुख दुःखाच्या कार्यक्रमा करीता करीत असतात. वाद जागेवर समाज मंदीर आहे. त्याचा वापर करतांना कुणालाही त्रास किंवा असुविधा होत नाही.

**०६.** वादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी बेकायदेशीरपणे ठराव घेउन शहिदाच्या स्मारका करीता जागा मंजुर केली अशी माहिती शासनाला असतांना सुध्दा विना चौकशी आणि ज्या गाव नमुना क्र.८ वर "सदर मालमत्ता आकारण नक्कल केवळ ग्राम पंचायत कर आकारणी असुन हक्का

बाबत हा दस्त कायदेशीर पुरावा सांगत नाही'' असे नमुद असतांनांही एकांगी विचाराने स्मारकाला ती जागा मंजुर करण्यात आली व म्हणुन गाव नमुना क्र.८ या पुराव्याला मालकी बाबत गृहित मुल्य नाही.

**०७.** वादींचे पुढे असे कथन आहे की, जिल्हाधिकारी हे स्मारक समितीचे शासन नियुक्त पदसिध्द अध्यक्ष आहेत व त्यांची कोणतीही सुचना अगर आदेश नसतांना प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी सप्टेंबर २०२४ ला समाज मंदीराची जागा सोडुन तार कुंपण जबरदस्तीने केले आहे व त्या तार कुंपणाचे कोणतेही, आदेश, टेन्डर, बिल अथवा कोटेशन नसतांना जबरदस्तीने करण्यात आले. यातुनच बौध्द विहाराकडे/समाज मंदीराकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध होत नसल्याने समितीला व प्रतिवादी क्र.६ व ७ यांना कळविले असता त्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. यानंतर प्रकरण चिघळले आणि समाजातील दोन विविध गटामध्ये भडका उडुन पोलिस स्टेशन, खंडाळा येथे परस्परा विरुध्द अपराधाच्या नोंदी दि.२३/१०/२०२४ रोजी अपराध क्र.३७५ आणि ३७६ अन्वये नोंदविल्या गेल्या. यामुळे, त्यांच्या गावात १५ दिवस पोलिस बंदोबस्त होता व तनावाचे वातावरन निवळल्या गेले नाही.

**०८.** वादींचे पुढे असे कथन आहे की, शहीद स्मारकासाठी उपलब्ध जागेसाठी निम्मी जागा घेउन काम करावे व निम्मी जागा समाज मंदीरासाठी खुली सोडावे असे त्यांचे म्हणने आहे. कारण समाज मंदीरात होणारे कार्यक्रम पुर्वी वापरत असल्याप्रमाणे नंतरही होतील आणि गावातील एकोपा कायम राहिल. परंतु, प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी तडजोडीचा प्रस्ताव नाकारला. यातुन अशांततेचा भडका व बोजवारा कधी उडेल याचा नियम नाही. प्रतिवादी क्र.८ ने प्रतिवादी क्र.९ ला कार्यारंभ आदेश देउन बेकायदेशीर जागेवर अवैध विकासाचे काम हस्तांतरीत केले आहे. त्यामुळे वादींनी दि.२५/०३/२०२५ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम च्या कलम २८०, महाराष्ट्र ग्रांम पंचायत अधिनियमाचे कलम १८० अन्वये व दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ८० अन्वये सुचनापत्र पाठवुन प्रतिवादी क्र.१ ते ९ ला कळविले व खुल्या जागेवर टाकलले तार कुंपण काढुन घ्यावे व स्मारकाबाबतची कार्यवाही थांबवावी असेही कळविले, पण त्यांनी ऐकले नाही. दि.२०/०३/२०२५ रोजी स्मारकाच्या संबंधी ले आउट देण्याकरीता पोलिस बंदोबस्त मागण्यात आला होता. स्मारकाचे काम पुढे झाल्यास व न थांबविल्यास वादींचे अपिरिमित नुकसान होईल त्यामुळे वादींना हा दावा रिप्रेझेटेटीव्ह सुट म्हणुन दाखल करावा लागला व मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ५ व ८, ९ यांनी स्मारकाचे बांधकाम करु नये, कोणतेही ले आउट टाकु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळावा यासाठी त्यांनी हा अर्ज केला. हा अर्ज मागाणी प्रमाणे मंजुर करावा अशी विनंती त्यांनी केली.

**०९.** प्रतिवादी क्र.१ व ८ यांनी या अर्जास लेखी म्हणणे नि.क्र.७२ दाखल केले व या अर्जास विरोध केला. त्यांनी असे कथन केले की, मौजा बेलोरा गावात बौध्द विहारा लगतचे १९५०० जागेमध्ये कार्यक्रम होत असल्याचे त्यांना अमान्य आहे. तसेच सदर दाव्यातील नमुद चतुः सिमा चुकीच्या नमुद केलेल्या

असुन, सदरच्या चतुःसिमा हया समाज मंदीराच्या चतुःसिमा नसुन संपुर्ण जागेच्या चतुःसिमेचा उल्लेख अर्जामध्ये केलेला आहे. सदर जागेशी अर्जदारांचा कोणताही प्रत्यक्ष सबंध नाही. प्रतिवादी यांचे कार्यालयातुन कार्यारंभ आदेशाबाबतची कार्यवाही वरीष्ठांचे आदेशाने व शासनाचे धोरणानुसार करण्यात आलेली आहे.

**१०.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी रितसर ठराव घेवुन त्यांचे अधिकार कक्षेनुसार सदर ठराव पारीत केला असल्यामुळे सदर ठराव अनाधिकाराचा आहे असे अर्जदाराचें म्हणणे चुकीचे आहे. सदरची जागा ही ग्रामपंचायतीच्या मालकीची असुन त्या बाबतची नोंद नमुना–८ मध्ये घेण्यात आलेली आहे. सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर शासनाव्दारे निधी मंजुर करण्यात आलेला असल्यामुळे शासनास सदर बाबीची पुर्ण परीस्थीची माहीती आहे. या प्रतिवादींनी कुठल्याही शासन निर्णयाचा भंग केलेला नाही. सदर स्मारकाची जागा शासकिय प्रकियेचा अवलंब करून व ग्राम पंचायतच्या ठरावानुसार शहिद स्मारकाच्या बांधकामाकरीता दिल्याने त्यानुसार जागेवर स्मारकाचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे.

**११.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ जिल्हाअधिकारी स्मारकाच्या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. परंतु सप्टेंबर २०२४ ला समाज मंदीराची जागा सोडुन जबरदस्तीने तार कुंपन केले ही बाब खोटी व चुकीची नमुद केली असुन स्मारकासाठी मंजुर करण्यात आलेली जागा योग्य त्या नियमानुसार कार्यवाही पार पाडुन मंजुर करण्यात आलेली आहे व स्मारकाचे वॉल कंपाउंड करीता शासनाद्वारे निधी मंजुर करण्यात आला असुन त्यानुसार सदर वॉल कंपाउंडचे ४ फुटापर्यंत बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर समाज मंदीरासमोर १० फुटाची खुली जागा असुन समाज मंदीराच्या दक्षिण बाजुला पुर्व–पश्चिम जाणारा अंदाजे १२ फुटाचा रस्ता आहे.

**१२.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, शहिद रामरावजी सोडगीर यांच्या स्मारकाकरीता विशेष ग्राम सभा घेवुन गावातील सर्व उपस्थित लोकांनी बहुमताने ठराव पारीत करून जागा देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर ठराव आजरोजीपर्यंत कायम असुन त्याविरूध्द कोणत्याही वरीष्ठ कार्यालयामध्ये अथवा न्यायालयामध्ये वाद प्रलंबित नाही. त्यामुळे निम्मी जागा समाज मंदीरासाठी खुली सोडावी, ही वादीची मागणी चुकीची असुन त्यामध्ये कुठलीही तडजोड झालेली नाही. वादीने जाणीवपुर्वक देशासाठी शहिद झालेल्या जवानाच्या स्मारकाच्या विषयास जातीय रंग देण्याचा प्रयत्न करुन गावामध्ये तेढ निर्माण होईल व गावातील शांतता व एकोपा भंग होईल या प्रकारे दावा दाखल केला आहे.

**१३.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क.८ यांच्या कार्यालयाने प्रतिवादी क.९ यांना वरिष्ठांच्या आदेशानुसार कार्यारंभ आदेश दिला असुन त्यानुसार शासनाद्वारे निधी मंजुर करण्यात आला आहे. त्याकरीता कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला आहे. समाज मंदीराचे बांधकाम झालेले असुन सदर समाज मंदीर सर्व धर्मीयाकरीता खुले असुन त्याकरीता

शासनाने निधी मंजुर करून बांधकाम केले आहे. शहिद स्मारकाचे होणारे बांधकाम सुध्दा एका विशिष्ट समाजासाठी नसुन देशांची सेवा केलेल्या शहिदाचे स्मरणार्थ बांधण्यात येणार असुन सध्या फक्त स्मारकाच्या वॉल कंपाउंड करीता निधी मंजुर झालेला असुन वॉल कंपाउंडचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. शहिद स्मारक झाल्यास पुढील पिढीस सुध्दा देश सेवा करण्याकरीता निश्चीत प्रेरणादारक राहिल. सदर वॉल कम्पाउन्डचे बांधकाम ग्रामसभेमध्ये ठराव पारीत करून करण्यात आलेले आहे.

**१४.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, दि.१६/११/२०१५ रोजी विशेष ग्रामसभेमध्ये घेण्यात आलेला ठराव हा गावातील नागरीकांचे उपस्थीतीमध्ये बहुमताने घेण्यात आलेला आहे. सदर ठरावाचे दरम्यान वादी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने आक्षेप नोंदविला नाही. तसेच ठरावाचे विरूध्द अद्याप पावेतो कोणताही आक्षेप किंवा अपील दाखल नाही. सदर स्मारकाच्या बांधकामाकरीता शासनाने सर्व प्रक्रीया पार पाडुन निधी मंजुर केलेला असल्यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याची तसेच वादीवर किंवा इतरांवर अन्याय कारक होईल हे वादीचे म्हणने चुकीचे आहे. सदर परीसरामध्ये कोणतेही बौध्द विहार नसुन समाज मंदीर शासकीय निधीतुन बांधण्यात आलेले आहे. परंतु वादीने जाणीव पुर्वक सदर दाव्यामध्ये वेळोवेळी बौध्द विहाराचा उल्लेख केलेला आहे. शहीद स्मारक सुध्दा शासकीय निधी व्दारे बांधण्यात येत असुन सदर जागेची व स्मारकाची मालकी सुध्दा शासनाची राहणार आहे. त्यामुळे सदर स्मारकाचे बांधकाम करण्यात येवु नये असा तात्पुरता व कायम मनाई हुकुम मागण्याचा कोणताही अधिकार वादीस प्राप्त होत नाही करीता वादीची मागणी चुकीची व बेकायदेशीर असल्याने वादीचा अर्ज खारीज होण्यास पात्र आहे.

**१५.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, सदर स्मारकाचे बांधकाम करण्याकरीता महाराष्ट शासनाचे ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्र.२०१६/प्र.क.०३/पंरा–९, दिनांक ११ ऑगष्ट, २०१६ व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.स्मारक ३११३/प्र.क.३०८/२९ दि.१२ जानेवारी, २०१६ अन्वयें स्वातंत्र सैनिक यांचे स्मारके उभारण्यासाठी एक वाक्यता राहण्याच्या अनुषंगाने दिनांक २४/१०/२०१८ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती निर्माण करण्यात आली असुन त्या समितीमध्ये एकुण १५ सदस्य आहेत. याबाबत दिनांक २८ जुन, २०२१ रोजी शासन निर्णय क्र. स्मारक २०२१/प्र.क्र.६४/योजना–११ पारीत करण्यात आला आहे. या समितीने शासनाद्वारे दिलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात आला आहे.

**१६.** या प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादीने त्यांच्या अर्जामध्ये केलेली विनंती चुकीची बेकायदेशीर व अनाधिकाराची असल्यामुळे अर्जदाराचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. याउलट अर्ज मंजुर झाल्यास जण भावनेचा अनादर होईल, शासनाच्या निधीचा अपव्यय होईल, देशसेवेसाठी शहीद झालेल्या सैनिकाच्या बाबतीत

चुकीचा संदेश समाजामध्ये जाईल. त्याचप्रमाणे शहिद सैनिक श्री. रामराव सोडगीर, स्मारक समिती अध्यक्ष, सचिव व सदस्य यांना आवश्यक पक्ष म्हणुन जोडणे आवश्यक होते. त्यांना आवश्यक पक्ष न जोडल्यामुळे दावा टिकत नाही. अशा सर्व कारणास्तव वादींचा हा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

**१७.** प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी आपला दाव्यास लेखी जाबब निशाणी क्र.६९ दिला व वादीच्या मागणीस विरोध केला. प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी दाव्यास लखी जबाब निशाणी क्र.४८ व पुरसिस निशाणी क्र.४९ दाखल केला व वादींचे कथन नाकारले. त्यांनी पुढे असे कथन केले की, ग्राम पंचायत बेलोरा येथील कर आकारणी रजिस्टर मधील अनु.क. ९७७ वरील मालमत्ता ही ग्राम पंचायत बेलोरा यांची खुली जागा असून, सदर जागा ही शहीद स्मारक सोडगीर स्मारक करिता जागा देण्यात आल्याची नोंद भोगवटदाराचे रकान्यात करण्यात आली आहे. सदरचा गाव नमुना हा सन २०१६–१७ मध्येच तयार करण्यात आलेला आहे. सदर कर आकारणी रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नोंद ही दिनांक २६/११/२०१५ रोजीचे ग्राम सभेतील ठराव कं. २ नुसार देण्यात आली आहे. त्यामध्ये समाज मंदीराचे बांधकाम सोडून बांधकामापासून उत्तरेस समाज मंदीराकरिता ५ फुट जागा, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस सिमेंट रस्ता, व पुर्वेस १० फुट जागा असून, उर्वरित खुली जागा शहीद स्मारकाकरिता देण्यात आलेली आहे. त्यामुळे समाज मंदिराचे जागेला कुठलाही अडथळा होणार नाही याची ग्राम सभेने काळजी घेतली आहे. ग्राम पंचायत अधिनियमातील कलम ५९ मधील तरतुदीनुसार वादीचा दावा मुदतित नाही. तसेच या कलमा नुसार वादींना जिल्हाधिकाऱ्याकडे आव्हान देण्याची मुभा आहे व त्यामुळे या न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार येत नाही. या सर्व कारणास्तव वादींचा अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**१८.** प्रतिवादी क्र.९ या संस्थेने पुरसिस निशाणी क्र.४९ आणि ५४ दाखल केली व प्रतिवादी क्र.६ व ७ ची लेखी कैफियत त्यांनी मान्य केली. प्रतिवादी क्र. ६ व ७ चे कथन वर घेतलेले आहे त्यामुळे मी पुन्हा त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

**१९.** प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रतिवादी क्र. ६ व ७ ची लेखी कैफियत मान्य केली व त्यासाठी पुरसिस निशाणी क्र.१०१ दाखल केली. प्रतिवादी क्र. ६ व ७ चे कथन वर घेतलेले आहे त्यामुळे मी पुन्हा त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

**२०.** वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ च्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**२१.** पटलावरील उपलब्ध कथनावरुन माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी त्यांची केस प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय? | ..... नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ..... नाही. |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | ..... नाही. |
| ४. | आदेश काय ? | –अंतीम आदेशा प्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**२२.** वादींनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ पटलावर दस्तऐवज यादी नि.क्र.०३,०९ वर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ व ८ तर्फे यादी निशाणी क्र.८९ वर कागदपत्रे दाखल केलेले आहेत. तर प्रतिवादी क्र.६,७ व ९ तर्फे यादी निशाणी क्र.५२ वर कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

**<u>मुद्या क्र.०१ ते ०४ करीता</u> :–**

**२३.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने त्यांचा एकत्रीतरित्या विचार करण्यात येतो.

**२४.** या अर्जामध्ये वादींचे असे कथन आहे की, वाद जागेमध्येच समाज मंदीर/बौध्द विहार आहे व त्याचा उपयोग बौध्द धर्मीय नागरीक वेगवेगळया समारंभासाठी व उपासणेसाठी करतात व ते करीत असतांना उरलेली जागा/लगतची जागा १९५०० चौ.फुट त्यासाठी वापरतात. पण या जागेपैकी प्रतिवादीं क्र.६ व ७ यांनी शहिद स्मारकासाठी जागा दिली व ती जागा दि.२६/११/२०१५ रोजीच्या बेकायदेशीर ठरावाने दिली. गावातील श्रीकृष्ण नगर येथे एक जागा मंजुर झाली होती तरी देखील त्या स्मारकासाठी बौध्द विहाराजवळची जागा बेकायदेशीररित्या मंजुर करण्यात आली. ठरावाने जागा मंजुर करण्या अगोदर प्रतिवादी क्र.४ ची कोणतीही पुर्व परवानगी नव्हती. प्रतिवादी क्र.१ स्मारक समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतांनाही त्यांची कोणतीही सुचना अगर आदेश नसतांना प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी सप्टेंबर २०२४ ला समाज मंदीराची जागा सोडुन तार कुंपण जबरदस्तीने केले आहे व त्यासाठी कोणताही आदेश, टेंडर, बिल अथवा कोटेशन नसतांना जबरदस्तीने केले. म्हणुन सध्या चालु असलेल्या स्मारकासाठीचे कामं तात्पुरत्या मनाई हुकूमाने थांबवावे लागेल. याउलट प्रतिवादींचे असे कथन आहे की, बेलोरा गावांमध्ये समाज मंदीर आहे व ते शासनाच्या निधीतुन बांधण्यात आले आणि देखभाल ही ग्राम पंचायत करते. त्या गावात कोणतेही बौध्द विहार नाही. शासनाने मंजुरी दिल्यामुळे व प्रतिवादी क्र.१

च्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती काम करीत असल्यामुळे आणि तशी आर्थीक तरतुद मंजुर झाल्यामुळे ते शहिद स्मारकाचे काम चालु आहे व यामध्ये वादींचे काहीही नुकसान नाही किंवा वादींना ते अडविण्याचा अधिकार नाही.

**२५.** म्हणजेच प्रथमदर्शनी वादींनी दाखवुन द्यावे लागेल की, मौजे बेलोरा येथे समाज मंदीर/बौध्द विहार आहे व त्याचा उपयोग बौध्द समाजाचे नागरीक उपासणेसाठी व विविध कार्यक्रमासाठी करतात. दुसरी बाब अशी की, त्या समाज मंदीर/बौध्द विहारा लगत १९५०० चौ. फुट जागा खुली आहे व त्या जागेचा वापर ते करतात. मान्यता मौजे बेलोरा गावात समाज मंदीर आहे ही बाब प्रतिवादींना मान्य आहे. तसेच या समाज मंदीराचा उपयोग गावकरी/नागरीक करतात असेही प्रतिवादींना मान्य आहे. पण त्या गावामध्ये बौध्द विहार आहे हे त्यांनी नाकारले. त्यामुळे प्रथम जबाबदारी ही वादींवर जाते व त्यांनी त्या गावात बौध्द विहार आहे व त्या लगत १९५०० चौ.फुट जागा खुली आहे व ते त्यांचा वापर करतात हे त्यांनी प्रथमदर्शनी दाखवुन दयावे लागते. मान्यता बौध्द विहाराची नोंद किंवा समाज मंदीराची नोंद असणारा कोणताही कागद त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे वादींनीच आपल्या दाव्यात नमुद केले. याचे स्पष्टीकरण देतांना दावा परिच्छेद क्र.०६ मध्ये त्यांनी कारण नमुद केले की, ग्रामपंचायत बेलोरा येथे अतिक्रमणाच्या जागेचे किंवा शासकीय जागेचे रजिस्टर मेंटेन नाही. तसेच ज्या जागेचे अधिकार अभिलेख तयार नाही त्या जागा निश्चीतपणाने ग्रांम पचांयत मालकीच्या आहेत किंवा महाराष्ट्र राज्याच्या मालकीच्या आहेत हे स्वयं स्पष्ट होत नाही असेही त्यांनी कारण पुढे केले. संचीका असेही दर्शविते की, वादींनी ही कारणे पुढे केली व बौध्द विहाराच्या जागे बाबत पटलावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. तसेच बेलोरा गावात समाज मंदीर आहे असे या क्षणी गृहित धरले तरी ते नेमके कुठे आहे व कोणत्या क्षेत्रफळाचे आहे व चतुःसिमेतील आहे ही बाब ही प्रथमदर्शनी दाखविण्यासाठी वादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल केला नाही. त्याबरोबरच या समाज मंदीर/बौध्द विहाराच्या बाजुला लगत १९५०० चौ.फुट जागा शिल्लक आहे असे दर्शविणारा कोणताही कागद किंवा नकाशाही वादीतर्फे पटलावर दाखल नाही. पण वादीने दाखल केलेल्या यादी निशाणी क्र.३ वरील दस्त क्र.४ या ग्राम पंचायत बेलोराच्या रजिस्टर मधील पान क्र.१ ते ५३ मधील ८ पानाच्या झेरॉक्स प्रती वरुन असे दिसते की, मौजे बेलोरा येथील वार्ड क्र.१ मधील ग्राम पंचायतच्या ताब्यातील खुल्या जागेमधील समाज मंदीराचे बांधकाम सोडुन उर्वरीत खुली जागा शहिद स्मारकसाठी देण्यात यावी असा ठराव पास झाला होता व तो ठराव ग्राम पंचायत बेलोराने घेतला होता. म्हणजेच या दि.२६/११/२०१५ रोजीच्या ग्राम पंचायतच्या ठरावा वरुन असे दिसते की, समाज मंदीराच्या बाजुला असलेल्या खुल्या जागेमध्ये शहिद स्मारकासाठी ती जागा देण्यात आली. म्हणजेच वादीने कथन केल्या प्रमाणे याक्षणी प्रथमदर्शनी असे म्हणता येते की समाज मंदीराच्या बाजुची खुली जागा ही शहिद स्मारकासाठी बेकायदेशीररित्या देण्यात आली असे वादींना म्हणावयाचे आहे व हिच जागा वादाचा विषय आहे. त्याबरोबरच असेही

म्हणता येते की, समाज मंदीराच्या बाजुला ती खुली जागा आहे व ती शहिद स्मारकासाठी त्या ठरावाने देण्यात आली असे वादींनी प्रथमदर्शनी दाखवुन दिले.

**२६.** तो सन २०१६ चा ठरावच बेकायदेशीर आहे असे वादींचे कथन आहे. तसेच समाज मंदीराच्या बाजुची ती खुली जागा बौध्द समाजाचे नागरीक उपासणेसाठी व वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी वापरत होते व गावात दुसरीकडे जागा शिल्लक असतांना प्रतिवादी ग्राम पंचायतने बेकायदेशीररित्या ती खुली जागा शहिद स्मारकाला दिली असेही वादींचे कथन आहे. मान्यता समाज मंदीर मंजुर होत असतांना त्यासोबत ती खुली जागा वापराचा अधिकार वादींना, बौध्द धर्मीय नागरीकांना मंजुर करण्यात आली होती व ती खुली जागा त्यासाठीच सोडण्यात आली होती याबाबत वादीतर्फे पटलावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला नाही. कारण असेलेली खुली जागा वापरणे हा वेगळा भाग आहे व असलेली खुली जागा वापरण्याचा आपल्याला लेखी अधिकार मिळालेला आहे हा वेगळा भाग आहे. म्हणजेच लेखी अधिकाराने ती खुली जागा समाज मंदीरासाठी सोडण्यात आली होती असा कोणताही कागद वादींतर्फे पटलावर नाही. याक्षणी असे नक्कीच म्हणता येईल की, गावातील नागरीक म्हणुन वादी हे समाज मंदीरा समोरील जागा खुली होती म्हणुन वापरत होते असे प्रथमदर्शनी दिसते.

**२७.** ग्राम पंचायत बेलोराला शहिद स्मारकासाठी ती खुली जागा मंजुर करण्याचा अधिकार नव्हता व म्हणुन तो सन २०१६ चा ठराव बेकायदेशीर आहे असे वादींचे कथन आहे. त्याबरोबरच ती जागा देतांना प्रतिवादी क्र.४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची पुर्व परवानगी नव्हती म्हणुनही तो ठराव बेकायदेशीर आहे असेही वादींचे कथन आहे. माझ्यामते ती शहीद स्मारकाला दिलेली जागा नेमकी कुणाच्या मालकीची आहे याबाबत वादींनी दाव्यामध्ये स्पष्टपणे कथन केले नाही. म्हणजेच ग्राम पंचायतची मालकी नाकारुन ती जागा नेमकी कुणाच्या मालकीची आहे याबद्दल वादींना काय ठामपणे म्हणायचे आहे याबद्दलचा बोध होत नाही. मान्यता ती जागा कुणाची खाजगी मालमत्ता आहे किंवा मालकीची आहे असे वादींचे दाव्यात कुठेही कथन नाही. सदर जागा गावामध्ये व ग्राम पंचायतीच्या हददीमध्ये आहे व ती खुली आहे आणि शहिद स्मारकाला ठरावाने देण्यात आली येवढे तरी वादींच्या दाव्यातील कथनावरुन याक्षणी स्पष्ट होते. पण तरीही वादींनी ग्राम पंचायत बेलोऱ्याची या जागेवरील मालकी नाकारली व त्या जागे बाबत ग्राम पंचायतीला म्हणजेच प्रतिवादी क्र. ६ व ७ ला ठराव घेण्याचा अधिकार नाही व जागा मंजुर करण्याचा अधिकार नाही असे वादींचे कथन आहे. ग्राम पंचायत सोडुन ईतर कुणाचा त्या जागेवर मालकी हक्क आहे किंवा ताबा आहे असे वादींचे स्पष्ट कथन नाही. मान्यता गाव नमुना -८ मधील नोंदी बाबत वादींनी कायदेशीर बाब समोर आणलेली आहे. वादींनी यादी निशाणी क्र.३ वर दस्तऐवज क्र.४ सोबत जोडलेल्या छायांकीत प्रती मधील नमुना नं.-८ मधील नोंदी कडे माझे लक्ष वेधले व यामध्ये असलेल्या टिप सदराचे वाचन करुन ग्राम पंचायत ही वाद जागेची मालक होउ शकत नाही असे युक्तीवादात नमुद करण्यात आले. मान्यता यामधील टिपमध्ये असे लिहिण्यात आले की, "सदर मालमत्ता

आकारणी नकक्ल केवळ ग्राम पंचायत कर आकारणी बाबत असुन हक्का बाबत हा कायदेशीर पुरावा सांगत नाही. नमुद मोजमाप तांत्रीक दृष्टया प्रमाणीत तथा प्रमाणबध्द केलेली नाहीत''. यामध्ये मालकाचे नांव ग्राम पंचायत बेलोऱ्याची खुली जागा असे नमुद असुन भोगवटदाराचे नांव म्हणुन शहिद स्मारकाला जागा देण्यात आली असेही नमुद आहे. महत्वाची बाब म्हणजे ही खुली जागा १९५०० चौ. फुट असल्याची नोंद आहे. मान्यता प्रस्थापीत न्यायतत्वानुसार असे म्हणता येईल की, हा मालकीचा पुरावा होउ शकत नाही. पण हा कागद याक्षणी ताब्याच्या अनुषंगाने वादींच्या कथनाच्या विपरीत आहे व ग्राम पंचायत बेलोराच्या बाजुने आहे असे याक्षणी तरी प्रथमदर्शनी दर्शवितो. कारण दावा परिच्छेद क्र.१२ मध्ये वादींनी असे कथन केले की, उपलब्ध जागेपैकी निम्मी जागा स्मारकसाठी घेउन निम्मी जागा समाज मंदीराकरीता खुली सोडावी असे वादींचे म्हणने होते पण प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी बेकायदेशीर टाकलेले कुंपण काढले नाही व वाटाघाटी करण्याची कोणतीही तयारी स्मारक समितीच्या पुरस्करत्यांनी बोलुन दाखविले नाही. त्या बरोबरच याच प्रमाणे निम्या जागेचा प्रस्ताव आपण दिला होता पण ग्राम पंचायतीने व स्मारक समितीच्या सदस्यांनी दुर्लक्ष केले याबाबत दावा परिच्छेद क्र.९ मध्ये कथन करण्यात आले. म्हणजेच या जागे बाबत वादींनी प्रतिवादी क्र. ६ व ७ म्हणजेच ग्राम पंचायत बेलोराकडे मागणी केली होती असे त्यांना म्हणावयाचे आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसते. तसेच यादी निशाणी क्र. ३ सोबत दाखल करण्यात आलेल्या दस्त क्र.९ मधील उपविभागीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना दिलेल्या पत्रावरुनही सदरचीच बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते. कारण हे पत्र सुध्दा असे दर्शविते की, सदरची खुली जागा वादी व बौध्द समाजाचे नागरीक वापरत होते व ते बेकायदेशीरित्या प्रतिवादी क्र. ६ व ७ ने अतिक्रमण करुन काढुन घेतली असे त्यांना म्हणावयाचे आहे. तसेच याच यादीतील दस्त क्र.१२ व १३ या पत्रावरुनही वादींना तसेच म्हणावयाचे आहे. म्हणजेच याक्षणी वादींची ही मागणी प्रथमदर्शनी असे दर्शविते की, ती खुली जागा ग्राम पंचायतच्या मालकीची व ताब्याची आहे म्हणुन त्यांनी ग्राम पंचायतकडे वेळोवेळी मागणी केली होती व त्यानंतर प्रतिवादी क्र.१, २ आणि ५ कडे मागणी केली होती असे त्यांना म्हणावयाचे आहे. त्याबरोबरच दस्त क्र.१२ व १३ या वादींच्या/गावकऱ्यांच्या पत्रावरुन असेही दिसते की, जिल्हाधिकाऱ्याकडे म्हणजेच शासनाकडे वादींनी त्या जागेपैकी १०,००० चौ. फुट जागा बौध्द विहारासाठी संरक्षीत करण्यासाठी मागणी केली होती व उरलेली जागा स्मारकाला दयावी असेही म्हटले होते. यामध्ये ती जागा शासनाच्या मालकीची आहे असेही कथन केले होते. म्हणजेच ती जागा वादींच्या मालकीची नाही किंवा समाज मंदीर बांधत असतांना किंवा मंजुर होत असतांना ती खुली जागा त्याचा भाग नव्हती असे याक्षणी प्रथमदर्शनी स्पष्ट होते. तसेच मौजा बेलोरा येथे बौध्द विहार नाही व ती खुली जागा बौध्द विहाराची नव्हती किंवा लेखी अधिकाराची नव्हती असेही याक्षणी स्पष्ट होते. म्हणुन याक्षणी असे म्हणता येते की, ती जागा खुली आहे म्हणुन आपण वापरत होतो येवढेच कथनावर वादींनी हा दावा समोर केला आहे व मागणी केली आहे.

**२८.** सदर सन २०१०चा ठराव बेकायदेशीर आहे व प्रतिवादी क्र. ६ आणि ७ ला अधिकार नसतांना ती खुली जागा त्यांनी शहिद स्मारकाला देण्यासाठी बेकायदेशीररित्या ठराव मंजुर केला म्हणुन स्मारकाचे चालु असलेले बांधकाम थांबवावे असे वादींचे कथन आहे व तशी मागणी या अर्जात आहे. वादींनीच दाखल केलेल्या यादी निशाणी क्र.३ वरील दस्त क्र.४ मधील प्रतिवादी ग्राम पंचायतच्या दिनांक २६/११/२०१५ रोजीच्या ठरावाच्या छायांकित प्रतीवरुन असे दिसुन येते की, तो ठराव ग्राम पंचायतने पारीत करुन शहिद स्मारकाला ती खुली जागा सार्वजनीक उपयोगा करीता देण्याचे ठरले याबाबत होता. वादींनी याच यादी सोबत दस्त क्र.६ म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या दि.११/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाची छायांकीत प्रत दाखल केली. या निर्णयावरुन असे दिसते की, स्मारके उभारण्यासाठी मोठया किमतीच्या आराखड्यांना मान्यतेसाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समीती गठीत करण्यात आली व स्मारके उभारण्याकरीता एक वाक्यता राहण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावर समिती गठीत करण्याची प्रस्तावित करण्यात आले. जिल्ह्या वरील समितीमध्ये जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील व ईतर ११ सदस्य असतील ज्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अधीक्षक, अभियंता सार्वजनीक बांधकाम मंडळ व कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग हे सदस्य असतील असेही यामध्ये नमुद आहे. या संबंधाने प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी यादी निशाणी क्र. ५२ वर दाखल केलेले कागदपत्र महत्वाचे ठरतात. यातील दस्त क्र.१ ही महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या दि.२८/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाची छायांकित प्रत आहे. यावरुन असे दिसते की, जिल्हाधिकाऱ्याच्या म्हणजेच प्रतिवादी क्र.१च्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती व त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ आणि ८ हे सदस्य होते व ती समिती शहिद सैनिक रामराव सोडगीर याचे स्मारक उभारण्यासाठी गठीत करण्यात आली होती याबददलचा हा शासन निर्णय आहे. त्याबरोबरच याच सोबत असलेल्या टिपणीवरुन असे दिसते की, ८४ लाखाचे अंदाजपत्र प्रतिवादी क्र.८ ने त्याबाबत सादर केले होते. तसेच या सोबतच असलेल्या दि.३१/०१/२०२५ रोजीच्या वर्क ऑर्डर/कार्यारंभ आदेश वरुन असे दिसते की, शहिद स्मारकाच्या संरक्षण भिंत, पेवर ब्लॉक व सौंदर्यकामासाठी रुपये २४,९१,२८६/– मंजुर करुन कार्यारंभ आदेश प्रतिवादी क्र.८ ने काढलेला आहे व त्यासोबत अंदाजे किम्मत, सामान्य उतारा व सामान्य अहवाल जोडलेला आहे. त्याबरोबरच प्रतिवादी क्र.१ व ८ च्या वतीने दाखल करण्यात आलेल्या यादी निशाणी क्र.८९ वरील कागदपत्रे सुध्दा याक्षणी महत्वाचे ठरतात. यातील दस्त क्र.१ ही दि.०४/०२/२०१९ रोजी उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग पुसद यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांना दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत आहे. यामध्ये शहिर रामराव सोडगिर च्या स्मारकाच्या बांधकामाचे सुधारीत प्रस्ताव कसा देण्यात आला होता व त्यामध्ये काय–काय आहे याबद्दल नमुद करण्यात आले होते. दस्त क्र.२ ही दि.१९/११/२०१८ रोजी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या संक्षीप्त टिपणीची छायांकीत प्रत आहे. असे दिसते की,

स्मारक उभारण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी दि.१९/०१/२०१८ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते याबाबत ही टिपणी आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/१०/२०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली होती असेही यावरुन दिसते. तसेच दस्त क्र.३ वरुन असेही दिसते की, प्रतिवादी क्र.५ यांनी उप–अभीयंता बांधकाम विभाग पुसद व प्रतिवादी क्र.७ यांना माहिती व लागणाऱ्या खर्चाचा व कामाचा आराखडा सादर करावा याबददलचे दिलले पत्र होते. दस्त क्र.४ असे दर्शविते की दि.१०/०५/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.१ ने उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत जिल्हा परिषद यवतमाळ यांनी स्मारकाच्या बांधकामा करीता लागणाऱ्या खर्चाचा व कामाचा आराखडा या बाबत माहिती मागीतली होती. तसेच दसत क्र.६ वरुन असे दिसते की, दि.०१/०३/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.१ ने मा. प्रधन सचिव ग्राम विकास मंत्रालय मुंबई यांना पत्र दिले होते व सदर स्मारकाला खर्च रुपये ७० लाख येतो याबद्दलचा प्रस्ताव समितीने शासनाला पठविला व त्यासाठी मंजुरी द्यावी व निधी द्यावा या पध्दतीची विनंती करणारे ते पत्र होते. म्हणजेच एकंदरीतरित्या उपलब्ध शासन निर्णयावरुन आणि पटलावर दाखल असलल्या पत्र व्यवहारावरुन ही बाब याक्षणी प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, शासनाच्या स्तरावर हे शहिद स्मारक उभारण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे व ते प्रतिवादी क्र.१ जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या देखरेखी खाली मंजुर आहे व चालु आहे असे स्पष्ट होते. यामध्ये प्रतिवादी क्र. ६ व ७ यांचा या प्रक्रियेत सरळ सरळ बेकायदेशीरपणा असल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही.

**२९.** वादींनी प्रतिवादी क्र.१ कडे मागणी केलेल्या पत्र व्यवहारावरुन या क्षणी असे दिसते की, समाज मंदीर/बौध्द विहार च्या बाजुला असलेल्या खुल्या जागेतील अर्धी जागा किंवा १०,००० चौ. फुट जागा त्याना म्हणजेच समाज बांधवांना सोडण्यात यावी अशी वादींनी मागणी केलेली आहे. मान्यता ती जागा लेखी अधिकाराने आपल्याला किंवा समाज बांधवांना पुर्णपणे अधिकार म्हणुन मिळाली होती किंवा वापरण्यास मिळाली होती व ती समाज मंदीर मंजुर करतांना/बोध्द विहार मंजुर करतांना लेखी मिळाली होती असे कथन याक्षणी वादीतर्फे नाही किंवा तसा कोणताही कागद याक्षणी पटलावर दाखल नाही. त्यामुळे ती जागा ते वापरत होते येवढयाच कारणावर ते याक्षणी हक्क सांगुन हा दावा आणत आहेत असे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. पण गावातील खुली जागा शासनाने कुणाला दयायची, शासनाच्या कोणत्या विभागाने कोणत्या विभागाला द्यावी व कोणत्या विभागाने वापरायची हा सर्वस्वी अधीकार शासनाचा किंवा पंचायत राज व्यवस्थेमधील त्या–त्या संस्थेचा असतो असे याक्षणी म्हटल्यास न्यायाची बाजु सांभाळली जाउ शकते. या संदर्भात महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमाचे कलम ५१ आणि ५५ व ५६ मधील तरतुदी महत्वाच्या ठरतात. मान्यता हा नियम खाजगी जागेस लागु राहाणार नाही व खाजगी जागे बाबत काय करायचे या बद्दलची प्रक्रिया वेगळी आहे.

**३०.** ती खुली जागा म्हणजेच शहिद स्मारकाला मंजुर केलेली जागा ही

ग्राम पंचायतची आहे असे प्रतिवादी क्र.६ व ७ चे कथन आहे. तर ग्राम पंचायतमध्ये अतिक्रमण व खुल्या जागेचे रजिस्टर मेंटेन नसल्यामुळे ती जागा ग्राम पंचायतची आहे की शासनाची आहे हे स्पष्ट नाही असे वादींचे कथन आहे. मान्यता वादीं तर्फेच दाखल करण्यात आलेल्या यादी निशाणी क्र.३ वरील दस्त क्र.४ वरील नमुना क्र.८ ची प्रत जी दाखल आहे त्यावरुन प्रथमदर्शनी ती जागा ग्राम पंचायत बेलोऱ्याच्या ताब्यात आहे व त्यातील जागा स्मारकाला दिल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. या विपरीत कोणताही कागदोपत्री पुरावा वादींतर्फे याक्षणी पटलावर दाखल नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र.१ व ८ यांनी लेखी म्हणने निशाणी क्र.७२ दाखल केले व प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी आपला लेखी जाबाब निशाणी क्र.६९ दाखल केला व ती जागा ग्राम पंचायत बेलोरा यांची खुली जागा असल्याचे कथन केले. मान्यता प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी पुरसिस निशाणी क्र.१०१ दाखल केली व प्रतिवादी क्र.६ व ७ ची लेखी कैफियत मान्य केली. प्रतिवादी क्र.६ व ७ ने ती खुली जागा ग्राम पंचायतच्या मालकीची आहे असे कथन केले. म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचे कथन असे दर्शविते की, ती खुली जागा ही ग्राम पंचायत बेलोराची आहे असे त्यांना म्हणावयाचे आहे.

३१. वादींच्या वकिलांनी आपल्या युक्तीवादात नमुद केले की, प्रतिवादी क्र. ६ व ७ ने सन २०१६ चा तो ठराव बेकायदेशीर घेतला व ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५५ आणि ५६ नुसार शहिद स्मारकाला जागा मंजुर करण्या अगोदर प्रतिवादी क्र.४ ची कोणतीही पुर्व परवानगी नव्हती व म्हणुन तो ठराव वादीवर बंधनकारक नाही. सदर अधिनियमाच्या कलम ५५ व ५६ चे मी बारकाईने अवलोकन केले. असे म्हणता येते की, याक्षणी ही तरतुद वादीला मदत करणारी आहे असे दिसत नाही. कारण कलम ५५ नुसार असे म्हणता येईल की, कलम ५१(१) अन्वये मिळालेल्या मालमत्ता सोडुन ग्राम पंचायतच्या असलेल्या मालमत्ता ग्राम पंचायत भाडयाने देउ शकते, विकु शकते व ईतररित्या हस्तांतरीत करु शकते. पण या सर्व बाबी त्या कायद्यातील उद्देशासाठी असल्या पाहिजे. तर कलम ५६ नुसार असे म्हणता येईल की, जिल्हा परिषदेकडे असणाऱ्या मालमत्ता या ती ग्राम पंचायतला देउ शकते किंवा वर्ग करु शकते. पण ग्राम पंचायत त्या मालमत्ता म्हणजेच अचल संपत्ती मुख्य कार्यकारी आधिकारी जिल्हा परिषद यांच्या पुर्व परवानगी शिवाय विकु शकत नाही, भाडयाने देउ शकत नाही किंवा ईतर बाबीसाठी हस्तांतरीत करु शकत नाही. मान्यता या सर्व तरतुदी नुसार याक्षणी असे म्हणता येईल की, मालमत्ता शासनाची असेल तर कलम ५१ नुसार तरतुद लागु होते व असे म्हणता येईल की मालमत्ता ही जिल्हा परिषदेची असेल व ती ग्राम पंचायतला दिलेली असेल तर कलम ५५ आणि ५६ ची तरतुद लागु होते. महत्वाची बाब म्हणजे कलम ५१(१–अ) नुसार असे म्हणता येते की, शासनाने ग्राम पंचायतला किंवा पंचायतीला दिलेली मालमत्ता शासन परत घेउ शकते. अशा परिस्थीतीत व कायदेशीर परिस्थीती लक्षात घेता हातातील प्रकरणात असे म्हणता येईल की, ती खुली जागा अगोदर कुणाची होती हा महत्वाचा प्रश्न उरतो व तो साक्ष पुराव्याचा भाग आहे. या बाबतची आपले कथन सिध्द करण्याची मुभा

वादीला राहिल. कारण याक्षणी ती जागा जिल्हा परिषदेने ग्राम पंचायतला दिली होती असा कोणताही पुरावा वादींतर्फे पटलावर दाखल नाही. जर ती शासनाची जागा होती तर शहिद स्मारक मंजुर करतांना महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय देउन ती जागा सार्वजनिक उपयोगसाठी घेतली असा प्रथमदर्शनी निष्कर्ष याक्षणी निघतो. दुसरी बाब अशी की, कलम ५१(१–अ) अन्वये शासनाने ती जागा परत घेतली असेल तर कलम ५५ व ५६ नुसार प्रतिवादी क्र.४ च्या पुर्व परवानगीची आवश्यकता राहत नाही असे म्हटल्यास न्यायाची बाजु सांभाळली जाउ शकते. त्यामुळे शहिद स्मारकाची जागा देतांना पुर्व परवानगी नव्हती असा निष्कर्ष याक्षणी काढता येत नाही. यास दुसरे कारण असे की, स्मारकाच्या समितीचे अध्यक्ष हे प्रतिवादी क्र. १ जिल्हाधिकारी आहेत व प्रतिवादी क्र.४ हे सदस्य आहेत. त्यांच्या देखरेखी खाले स्मारकाचे पुढील काम चालु आहे असेही प्रथमदर्शनी दिसते.

**३२.** प्रतिवादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, सन २०१६ च्या ठरावाला वादीं या दाव्यात आव्हान देत आहेत व ग्राम पंचायतच्या जागेस आपली वापराची जागा म्हणुन मागणी करीत आहेत ही बाब लक्षात घेता ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५९ व १४२ अन्वये या न्यायालयाला हा दावा चालविण्याचा अधिकार येत नाही व या तरतुदी अन्वये आव्हान देण्याची स्वतंत्र प्रक्रिया त्या कायद्यामध्ये अगोदरच दिलेली आहे. या अनुषंगाने ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५९ व १४२ चे बारकाईने अवलोकन केले. कलम ५९ बाबत असे म्हणता येईल की, ग्राम पंचायतीच्या मालमत्तेच्या अनुषंगाने आपल्याला ग्राम पंचायत मालमत्तेत अधिकार आहे असे एखादया व्यक्तीला वाटल्यास त्यामध्ये जिल्हाधिकारी चौकशी करु शकतात आणि आदेश पारीत करु शकतात. तसेच जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाची नोटिस मिळाल्यानंतर एक वर्षाच्या नंतर दावा दाखल झाल्यास तो मुदतीत नाही म्हणुन फेटाळता येतो अशीही ही तरतुद सांगते. म्हणजेच असे म्हणता येते की, आपल्याला ग्राम पंचायतच्या त्या खुल्या जागेवर वापर करण्याचा अधिकार होता असे वादींनीच कथन समोर आणले आहे व त्यातील अर्ध्या जागेची किंवा १०,००० चौ. फुट जागेची मागणी केलेली आहे ही बाब अशी दर्शविते की, वादी हे ग्राम पंचायतीच्या जागे संबंधाने आपला अधिकार आहे असे सांगुण दाव्यात मागणी करीत आहेत. पण कलम ५९ च्या तरतुदी नुसार असे म्हणता येईल की, ते ठरविण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना येतो. या प्रकरणात वादींनी जिल्हाधिकाऱ्याकडे तशी जागेची मागणी केल्या बाबत यादी निशाणी क्र.३ सोबत काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. यातील दस्त क्र.१२, १३ ही याबाबतच आहेत. ती जानेवारी २०२५ मधील आहेत. म्हणजेच वादींना जिल्हाधिकाऱ्याकडे तशी मागणी करुन ते मागणिचे प्रकरण पुढे चालविण्याचा अधिकार आहे. अशा स्थीतीत या दिवाणी न्यायालयास प्रथमदर्शनी हा दावा चालविण्याचे कार्यक्षेत्र येत नाही असे दिसते. तरीही हा मुद्दा साक्ष पुराव्या नंतर विचारात घेतल्यास न्यायाची बाजु सांभाळली जाउ शकते.

**३३.** तसेच सदर अधिनियमाचे कलम १४२ नुसार असे म्हणता येईल की, ग्राम पंचायतने एखादा ठराव मंजुर केल्यास त्यास थांबविण्याचा अधिकार

स्थायी समितीला येतो. तसेच, स्थायी समिती आयुक्ताला अहवाल पाठविते व त्यावर आयुक्ताला निर्णय घेण्याचा व त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार येतो. मान्यता सन २०१६ च्या ठरावाला आपण स्थायी समितीकडे आव्हान दिले होते किंवा नाही या बाबत वादींनी काहीही कथन केलेले नाही. त्याबरोबरच या तरतुदी नुसार असे म्हणता येते की, ग्राम पंचायतच्या ठरावाला आव्हाण देण्याची तरतुद यामध्ये आहे. दुसरी बाब अशी की, सन २०१६ च्या ठरावाला आपण एवढया वर्षामध्ये आव्हान का दिले नाही व आव्हान दिले होते काय याबाबतही वादींनी आपल्या दाव्यामध्ये काहीही स्पष्ट केलेले नाही. त्याबरोबरच सन २०२४ पर्यंत ठरावाची प्रत मिळविण्याचा प्रयत्न केला होता काय, त्या ठरावाला आव्हान म्हणुन काही तक्रारी किंवा विनंती अर्ज ग्राम पंचायतीला किंवा वरिष्ठला देण्यात आले होते काय याबाबतही वादींतर्फे कोणतेही कथन नाही. त्यामुळे, मुदतीच्या अधिनियमान्वये असे म्हणता येईल की, ठरावा बाबत वादींनी जी घोषणेची मागणी केली ती तीन वर्षाच्या आत दावा दाखल करुन करावयास पाहिजे होती पण ती करण्यात आली नाही म्हणुन दावा प्रथमदर्शनी मुदतबाहय वाटतो.

**३४.** समाज मंदीर/बौध्द विहार समोरील ती जागा समाज बांधव उपासणेसाठी व विविध कार्यक्रमासाठी वापरत असत पण ती शहिद स्मारकाला बेकायदेशीररित्या ठरावाने दिल्यामुळे तेथे स्मारक झाल्यास बौध समाज बांधवांचे अतोनात नुकसान होईल व ती वापरण्याची जागा हातुन जाईल असे वादींचे कथन आहे व म्हणुन ते बांधकाम थांबवावे अशी त्यांनी विनंती केली. माझ्या मते याक्षणी वादींची ही मागणी मंजुर करण्यासारखी दिसत नाही. कारण ती जागा वापरण्याचा आपल्याला काही लेखी अधिकार होता काय किंवा समाज मंदीरा सोबत तो अधिकार देण्यात आला होता काय याबाबत वादीतर्फे पटलावर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. त्याबरोबरच मौजे बेलोरा येथे बौध्द विहार आहे व त्या बाजुला ती खुली जागा आहे व त्या विहारा सोबत आपल्याला ती जागा वापरण्याचा लेखी अधिकार मिळाला होता याबाबतही वादीतर्फे पटलावर कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादींनी प्रथमदर्शनी हे दाखवुन दिले की, शासानाने मंजुरी दिल्यानंतर व शहिद स्मारकासाठी शासनाने ठरवुन दिलेल्या प्रक्रिये प्रमाणे ग्राम पंचायतने ठराव मंजुर केल्यानंतर व समितीने प्रक्रिया केल्यानंतर ती बांधकामाची प्रक्रिया चालु आहे. अशा स्थीतीत शहिद सैनिकाच्या स्मारकाचे बांधकाम थांबविल्यास समाजात चुकीचा संदेश जाउ शकतो. मान्यता वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या यादी निशाणी क्र.३ वरील महाराष्ट्र शासनाच्या दि.१२/०१/२०१६रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार असे म्हणता येईल की, स्मारक उभारण्याची जागा नागरीकाच्या दृष्टीने गैरसोयीची ठरणार नाही अथवा स्मारकामुळे सदर जागेमुळे धर्म/जातीमध्ये द्वेश वाढणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी असे सुचविण्यात आलेले आहे. मान्यता सदरची बाब समितीच्या आखत्यारीतली आहे व शासनाच्या कार्यक्षेत्रातील आहे. पण प्रक्रिया अवलंबली नाही व स्मारकाचे बांधकाम चालु आहे व त्यामध्ये वादींचे अगोदर अस्तीत्वात असलेले अधिकार बाधीत होतात असे प्रथमदर्शनी दिसत नाही.

त्यामुळे हा अर्ज नामंजुर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान नाही, पण प्रतिवादींचे नुकसान आहे. कारण तात्पुरता मनाई हुकूम दिल्यास स्मारकाचे बांधकाम थांबेल.

**३५.** प्रतिवादींच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मदनुरी श्री रामा चंद्रा मुर्ती–वि.–सय्यद जलाल C.A.No.5368/2017, 2017(13) SCC 174, आणि मा.उच्च न्यायालयाच्या चंदनसिंग –वि.– कोकीळाबाई बाळक्रिष्ण सलामे व ईतर 2021(3) Mh. L. J. P. No.494, ग्राम पंचायत –वि.– वासुदेव रामचंद्रजी मोहोड C.R.A.No.57/2012 D.On. 16/06/2014, अशोक मारुती राउत व ईतर –वि.– महाराष्ट्र शासन व ईतर 2013(3) Mh. L. J. P. No.733 या प्रकरणातील विषद केलेल्या न्यायतत्वावर भिस्त ठेवली.

**३६.** वरील सर्व न्यायतत्वांचे अवलोकन केले. मदनुरीच्या प्रकरणात असे विषद करण्यात आले होते की, वादीचा दावा व आरोप आणि कागदपत्रे पाहुनच दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे आधिकार वापरुन न्यायालय आदेश करु शकते. मान्यता सदरचे न्यायतत्व मी हा अर्ज निकाली काढतांना मार्गदर्शन म्हणुन घेत आहे. चंदनसिंगच्या प्रकरणामध्ये वाद हा आदिवासीच्या हक्का बाबत होता व कोणत्याही क्षणी दावा रिजेक्ट करता येतो असे न्यायतत्व विषद करण्यात आले होते. तर हातातील प्रकरणात ती स्थीती नाही. हातातील प्रकरणात या न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल अर्ज निशाणी क्र.५० अगोदरच निकाली काढलेला आहे. म्हणुन हे न्यायतत्व लागु पडत नाहीत.

**३७.** ग्रामपंचायत अंतोलाच्या प्रकरणात आपली खाजगी मालमत्ता होती असे वादीचे म्हणने होते व त्यावरील अनाधिकृत बांधकाम काढण्याबाबत ग्रामपंचायतने नोटिस दिली होती याबद्दल त्यात वाद होता. तसेच त्यामध्ये प्राथमीक मुद्दे दिवाणी न्यायालयाच्या अधिकाराबाबत काढण्यात आले होते व दोन्ही बाजुंचे ऐकुण व कथन वाचुन निकाल देण्यात आले होते. हातातील प्रकरणात या अर्जाच्या अनुषंगाने याक्षणी ती परिस्थीती नाही. तसेच त्यातील वाद ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५३, ५४ अन्वये विना परवानगी होत असेलेले बांधकाम पाडण्या संबंधीचा होता व दिवाणी न्यायालयाच्या अधिकारा बाबत होता. पण तशी स्थीती हातातील प्रकरणात नाही. त्यामुळे याक्षणी हे न्यायतत्व लागु पडत नाही. अशोक राउतच्या प्रकरणात जनहित याचीका दाखल झालेली होती व स्मारकासाठी शासनाने मागीतलेल्या जागेला ग्रामपंचायतने नाहरकत देउन ठराव पारीत केला होता याबाबत आव्हान देण्यात आले होते. त्यामध्ये ग्रामपंचायतने गायराणाची जागा स्मारकाला देउन शासनाला नाहरकत दिली होती. हातातील प्रकरणात शहिद स्मारकाची जागा कुणाची आहे याबाबत याक्षणी स्पष्ट होत नाही असे वादींचे कथन आहे. पण ती जागा ग्राम पंचायतची आहे असे प्रतिवादींचे कथन आहे. म्हणुन वादींना आपले कथन सिध्द करण्याची मुभा दयावी लागेल व तो साक्ष पुराव्याचा भाग असेल. त्यामुळे याक्षणी हे न्यायतत्व हातातील प्रकरणात लागु पडत नाही.

**३८.** तसेच प्रतिवादी क्र.१ च्या वतीने महादेव सावळाराम शेळके व

ईतर –वि.– पुणे महानगर पालिका व ईतर (1995) 3 SSC 33 D.On. 24/01/1995. या प्रकरणातील विषद केलेल्या न्यायतत्वार भिस्त ठेवण्यात आली. तर वादीच्या वतीने मा. उच्च न्यायालयाच्या अध्यक्ष कसारशिरांबे दुध उत्पादन संस्था–वि.–यशोदा अशोक माने व ईतर 2022(2) All M.R. P.No.137 या प्रकरणातील विषद केलेल्या न्यायतत्वार भिस्त ठेवण्यात आली. या दोन्ही न्यायतत्वांचे अवलोकन केले. अध्यक्ष कासारशिरांबे दुध उत्पादन संस्था या प्रकरणामध्ये ग्राम पंचायतीने वादी सोसायटीची जागा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या पुर्व परवानगी शिवाय पाण्याच्या टाकीसाठी मंजुर केली होती असे वादीचे म्हणने होते. मान्यता हातातील प्रकरणात तशी स्थीती नाही. कारण त्या प्रकरणात मालमत्ता ही सोसायटीची होती म्हणजेच खाजगी होती पण हातातील प्रकरणात मालमत्ता ही वादींची खाजगी मालमत्ता नाही किंवा गावातील कोणत्याही व्यक्तीची खाजगी मालमत्ता नाही. म्हणुन महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ५५ अन्वये वर दिलेल्या कारणामुळे याक्षणी प्रतिवादी बांधत असलेल्या स्मारकाचे बांधकाम हे प्रथमदर्शनी बाधीत होत नाही असे म्हणता येते.

**३९.** महादेव शेळकेच्या प्रकरणातील न्यायतत्वाचे अवलोकन केले असे दिसते की, त्या प्रकरणामध्ये जागा ही संपादीत करण्याची प्रक्रिया चालु होती व त्यामध्ये ताबा घेत असतांना अपिलार्थीने आपला ताबा घेउ दिला नाही व तो ताबा भाडे कराराप्रमाणे आहे असा बचाव घेतला होता. त्यामध्ये आपल्याला मिळालेला ताबा हा भाडे कराराने होता व नगर पालिकेने १९७२ च्या ठरावा नुसार दिलेला होता असेही त्याचे म्हणने होते. मान्यता त्यामध्ये ती जागा सार्वजनीक उपयोगासाठी संपादीत करण्यात येणार होती. त्यामुळे असे न्यायतत्व विषद करण्यात आले होते की, जिथे सार्वजनीक उपयोगासाठी जागा संपादीत किंवा विकसित करण्यात येते तेथे त्यामध्ये व्यथीत होणाऱ्या व्यक्तीला नुकसान भरपाई मोबदला देउन ती उनिव भरुन काढता येते. हातातील प्रकरणात होणारे शहिद स्मारक हे सार्वजनीक उपयोगासाठी आहे व सार्वजनीक बाब आहे ही बाब लक्षात घेता हातातील दाव्यातील हा अर्ज निशाणी क्र.५ मंजुर करता येणार नाही असे म्हटल्यास न्यायाची बाजु सांभाळली जाउ शकते.

**४०.** अशाप्रकारे असे म्हणता येते की, वादींची प्रथमदर्शनी केस नाही, अनुकुलतेचा कल वादींच्या बाजूने नाही व म्हणुन वादींचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपिरीमीत नुकसान होईल असे दिसत नाही. त्यामुळे वादींचा हा अर्ज या क्षणी नामंजूर करावा लागेल. येणे प्रमाणे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी काढून मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष म्हणून खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज निशाणी क्र.०५ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाचा मुद्दा मुळ दाव्याच्या अंतीम निकालाच्या वेळेस ठरविण्यात येईल.

SATISH YADAVRAO KADAM

Digitally signed by SATISH YADAVRAO KADAM
Date: 2025.06.26 18:05:47 +0530

**(सतीश या. कदम)**

दिनांक : २५/०६/२०२५ प्रभारी/सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

ठिकाण : पुसद. पुसद.